**महाराष्ट्र शासन**

# श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

जा.क्र. श्रीछशिमसरुसो/भांडार / 9880 / 2025
अधिष्ठाता यांचे कार्यालय,
श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर.
दिनांक- 12 /11/ 2025

## जाहीर ई निविदा सुचना.

अधिष्ठाता यांचे कार्यालय, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर करीता सन 2025-26 या वर्षामध्ये रुग्णालयातील रुग्णांकरिता **'ए-ब्लॉक' व 'बी-ब्लॉक' येथील (आय. पी. ग्रेड) 13 KL क्षमतेचे टँक करिता लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुनर्भरण करिता ई-निविदा** खालील तपशीलाप्रमाणे जाहीर ई-निविदा मागवित आहोत.

| अ.क्र | साहित्याचा तपशील. | निविदा फॉर्म फी ( ना परतावा) | निविदा बयाना (EMD) रक्कम भरावयाची | कालावधी |
|---|---|---|---|---|
| 1 | **'ए-ब्लॉक' व 'बी-ब्लॉक' येथील (आय. पी. ग्रेड) 13 KL क्षमतेचे टँक करिता लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुनर्भरण करिता ई-निविदा** | रु. 19,000/- | रु. 1,90,000/- | एक वर्षाकरिता |

नोट:- वरील कामाची ई-निविदा दि. 14 /11/2025 ते दि. 27 / 11 /2025 रोजी सांयकाळी 4:00 वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्तळावर उपलब्ध असेल.

अधिष्ठाता,
श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय,
सोलापूर

# श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

## अधिष्ठाता यांचे कार्यालय

**श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर परिसरातील 'ए-ब्लॉक' व 'बी-ब्लॉक' येथील (आय. पी. ग्रेड) 13 KL क्षमतेचे टँक करिता लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुर्नभरण करिता ई-निविदा.**

**ई - निविदा वेळापत्रक**

| अ.क्र | तपशिल | दिनांक व कालावधी |
|---|---|---|
| 1 | ई-निविदा सादर करण्याचा कालावधी | दि.14 /11/२०२5 रोजी सकाळी ११ वाजेपासून दि.27 /11/२०25 रोजी सांयकाळी ०४.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. |
| 2 | ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | अंतिम तारीख दि.27/11/२०२5 रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यत राहील. |
| 3 | निविदापुर्व बैठक | दि.19 /11/२०२5 रोजी सकाळी ११.०० वा. राहील. |
| 4 | ई-निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ | निविदा दि.28 /11/२०२5 रोजी वेळ- सकाळी ११.००वा. अधिष्ठाता यांचे दालनामध्ये उघडण्यात येतील. प्रशासकीय व तांत्रिक अडचणी मुळे निविदा उघडणे शक्य न झाल्यास संबंधीत निविदाधारकांना निविदा उघडण्याची तारीख व वेळ कळविण्यात येईल. |

**ई निविदा विषयी अटी व शर्ती –**

1. लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुर्नभरण करिता ई-निविदा डाऊनलोड करण्यासाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्तळावर उपलब्ध असेल, निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणालीच्या मेन पोर्टल **www.mahatenders.gov.in** वर इनरोल करणे आवश्यक आहे.
2. प्रशासकीय व तांत्रिक अडचणीमुळे निविदा उघडणे शक्य न झाल्यास सहभागी झालेल्या निविदाधारकांना निविदा उघडण्याची तारीख व वेळ कळविण्यात येईल.
3. लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुर्नभरण करण्याविषयी माहिती निविदेमध्ये दिलेली आहे.
4. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामाची एक अथवा सर्व ई-निविदा स्वीकारणे अथवा कारण न दाखवता रद्द करण्याचा अधिकार मा. अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे.
5. लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुर्नभरण करिता निविदा फी रु. 19,000/- व बयाणा रुक्कम रु. 1,90,000/- असे असेल, सदरील शुल्काची रक्कम ही फक्त नेट बॅकींग दवारे भरण्यात यावी.
6. निविदाकारांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन निविदा भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका /अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर 9665767038,9960172363 **व** 8668751418 संपर्क साधावा.

अधिष्ठाता,
श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर

# श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर
## अधिष्ठाता यांचे कार्यालय,

- **श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर परिसरातील 'ए-ब्लॉक' व 'बी-ब्लॉक' येथील (आय. पी. ग्रेड) 13 KL क्षमतेचे टँक करिता लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुनर्भरण करिता ई-निविदा मागविण्यात येत आहेत.**

### लिक्विड मेडिकल ऑक्सीजन (प्राणवायु) ई-निविदा विषयी अटी व शर्ती-

1) लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुनर्भरण निविदे करिता उत्पादक कंपनीस प्रथम प्राधान्य देण्यात येईल त्यानंतर पुरवठादारास प्राध्यान्य देण्यात येईल.
2) लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुनर्भरण करिता निविदाधारकाने लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुरवठयाचे दर वाहन खर्चासहीत नमुद करावेत व स्वखर्चाने या रुग्णालयाच्या मागणीनुसार तसेच गरजेनुसार निविदेमधील नमुद ठिकाणी तात्काळ पुरवठा करावा व त्यासाठी लागणारा वाहतुक खर्च वेगळा आकारता येणार नाही.
3) निविदाधारकाने निविदा स्विकारल्यानंतर निविदेच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून लिक्वीड मेडिकल ऑक्सीजनचा पुरवठा करावा निविदा स्विकारलेल्या कालावधीमध्ये पुरवठादारास लिक्वीड मेडिकल ऑक्सीजनचा तुटवडा पडल्यास अथवा ज्यादा दराने इतर ठिकाणाहून मागवून दयावा लागल्यास पुरवठादार लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुनर्भरणचे दर कमी अथवा जास्त मागणी करु शकत नाही याची नोंद घ्यावी.
4) ई-निविदेमध्ये नमूद केलेले लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुरवठयाचे दर हे सर्व करासहित, स्थानिक हमाली, तसेच वाहतुक इत्यादी बाबींचा समावेश करुन नमुद केलेले असावेत. पुरवठयाचे दर अक्षरी व अंकात नमूद करावेत तसेच लिहतांना कोणत्याही प्रकारची खाडाखोड झाल्यास दुरुस्तीवर पुरवठादाराने स्वाक्षरी तसेच आपल्या संस्थेचा शिक्का मारने आवश्यक आहे. निविदेच्या पृष्ठावर निविदाकाराची स्वाक्षरी असणे जरुरीचे आहे या निविदेमधील अटी व शर्ती व्यतीरिक्त पुरवठादार स्वत:च्या कोणत्याही नविन अटी व शर्तीचा समावेश करु शकत नाहीत तसे केल्यास कोणतेही सबळ कारण न देता निविदाधारकास अपात्र समजून निविदेमधून वगळण्यात येईल.
5) पुरवठादाराने लिक्वीड मेडिकल ऑक्सीजनचा पुरवठा संस्थेतील संबंधित विभाग प्रमुखांच्या अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी यांच्या प्रत्यक्ष ताब्यात मिळेपर्यंत सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहील, पुरवठा केल्याची पोच वस्तुनिहाय घेण्यात यावी.
6) लिक्वीड मेडिकल ऑक्सीजनच्या पुरवठयाची थकीत देयके शासनाकडे उपलब्ध असलेल्या अनुदान उ.क्र.(21) सामुग्री व पुरवठा या लेखाशीर्षातूनच प्रलंबित देयकांची अदायगी करण्यात येईल. प्रलंबित देयकांच्या रकमेकरिता जर पुरवठादाराने लिक्वीड मेडिकल मेडिकल ऑक्सीजनचा पुरवठा थांबवता अथवा बंद करता येणार नाही. लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन ही जीवरक्षक (Life Saving) बाब असल्याने पुरवठा खंडित करता येणार नाही.
7) लिक्वीड मेडिकल ऑक्सीजनच्या प्रलंबित देयकांच्या रकमेकरिता पुरवठा खंडित करता येणार नाही तसे केल्यास निविदेमधील दवीतीय न्युनतम दर (L2) असलेल्या पुरवठाधारकाला लिक्वीड मेडिकल ऑक्सीजनचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील, प्रथम न्युनतम दर (L1) व दवीतीय न्युनतम दर (L2) यामधील फरकाची रक्कम ही प्रथम न्युनतम दर (L1) यांच्या उपलब्ध देयकाच्या रक्कमेतून वसूल करण्यात येईल व पुरवठा करण्यास असक्षम असल्याचे समजून त्यापूढील सर्व पुरवठा आदेश दवीतीय न्युनतम दर (L2) यांना निविदा कालावधी संपेपर्यंत देण्यात येतील. या बाबतचे सर्व अधिकार व हक्क मा. अधिष्ठाता यांनी राखून ठेवला आहे.
8) लिक्वीड मेडिकल ऑक्सीजनचा पुनर्भरण वेळेत न झाल्यास व रुग्णालयातील लिक्वीड मेडिकल ऑक्सीजनची पातळी खाली जाऊन रुग्णसेवेत व्यत्यय निर्माण झाल्यास कोणतेही सबळ कारण न देता निविदा रद्द करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी राखून ठेवले आहेत व अशा व्यत्यय निर्माण करणाऱ्या पुरवठादारास काळ्या यादीत टाकण्यात येईल तसेच शासन नियमाप्रमाणे योग्य ती दंडात्मक कार्यवाही होईल.

9) लिक्वीड मेडिकल ऑक्सीजनच्या पुनर्भरणच्या देयकांची अंदाजित वार्षिक रक्कम रुपये 1,00,00,000/- (अक्षरी रुपये एक कोटी फकत) अंदाजे असून सदर रक्कमेच्या 3% एवढी रक्कम म्हणजे रक्कम रुपये 3,00,000/- (अक्षरी रुपये तीन लाख)सिक्युरिटी डिपॉझिट म्हणून एक वर्षाच्या मुदतीची पावती मंजुर निविदाधारकास भरावी लागेल. तसेच निविदा प्राप्त पुरवठादारास पुरवठा आदेश दिलेनंतर पुरवठादाराने १० दिवसाच्या आत कंत्राटीचा करारनामा रु.500/- च्या बाँडवर मा. अधिष्ठाता, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांच्या समक्ष करुन घ्यावा लागेल.

10) निविदाधारकाच्या दुकानाचे नांव दुकानाचे ठिकाण अधिकृत नोंदणी प्रमाणपत्र (शॉप इस्टॅब्लीशमेंट ॲक्ट) उत्पादक कंपनीचे नांव स्पष्ट केलेले व अद्ययावत नूतणीकरण केलेले असावे. निविदाधारकाने Purity report performance certificate जोडावे.

11) लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुनर्भरण निविदेचा कालावधी हा निविदा उघडल्यापासून पूढील एक वर्षापर्यंतचा कालावधी हा वैध असेल. सदर निविदेचा कालावधी समाप्त झाल्येनंतर निविदेस मुदतवाढ देण्याचा किंवा कालावधी कमी करण्याचा संपूर्ण अधिकार व हक्क मा. अधिष्ठाता, श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे.

12) निविदा फॉर्म सोबत जे प्रपत्र जोडले आहे, त्याच प्रपत्रामध्ये दर नमूद करावेत.

13) ई-निविदेत नमूद केलेल्या बाबींच्या संख्येमध्ये आवश्यकतेनुसार कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी राखून ठेवलेला आहे.

14) लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन ही बाब जीवरक्षक (Life Saving) अशी असून त्याच्या पुनर्भरणबसबतचे दर हे निविदाधारकाने प्रचलित स्थानिक बाजार भावाशी मिळतेजुळते असे भरावेत दरामध्ये खुप जास्त तफावत असू नये.

15) लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुनर्भरण निविदा उघडल्यानंतर निविदेमध्ये सहभागी झालेल्या निविदाधारकावर या पूर्वी पुरवठया संबंधी काही लेखी स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे आढळल्यास अशा निविदाधारकास त्या निविदेमधून कोणतेही सबळ कारण न देता निविदा प्रक्रियेमधून बाहेर काढले जाईल. व असे करण्याबाबतचे सर्व हक्क व अधिकार मा. अधिष्ठाता, श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे.

16) लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुनर्भरण प्रक्रियेमध्ये निविदाधारकाकडून सादर करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती विषयी कोणत्याही शंका निर्माण झाल्यास निविदाधारकाने अथवा त्यांच्या अधिकृत व्यक्तीने समक्ष खरेदी समिती समोर उपस्थीत राहून शंका असलेल्या कागदपत्राविषयी खुलासा सादर करावा व मुळ प्रमाणपत्रे समितीच्या समोर अवलोकनाकरीता उपलब्ध करणे बंधनकारक राहील तसे न केल्यास जरी आपण निविदेमधील प्रथम न्यनतम दर प्राप्त निविदाधारक (L1) असला तरी देखील आपणास सदर प्राप्त निविदेची गरज नसल्याचे समजून सदर निविदेमधून आपणास वगळण्यात येईल.

17) निविदाधारक शासकीय रुग्णालयापासून कमीत कमी २५० किलो मीटर पर्यंतच्या परिघामधील अंतरावर असणे आवश्यक आहे जेणेकरुन या रुग्णालयाच्या गरजेनुसार व वेळेत पुरवठादारास लिक्वीड मेडिकल ऑक्सीजनचा पुरवठा करता येईल.

18) निविदाधारकाने यापुर्वी लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुरवठयाबाबतचे काम इतर शासकीय रुग्णालयामध्ये केलेले असावे व पुरवठा करताना वाहनासोबत प्रशिक्षीत व्यक्ती असणे आवश्यक आहे जेणेकरुन आपत्कालीन स्थितीमध्ये लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुनर्भरण करताना कसल्याही प्रकारचे तांत्रीक बिघाड झाल्यास सक्षमपणे त्याचे व्यावस्थापन करण्याचे कौशल्य असलेली व्यक्ती वाहनासोबत असावी.

19) न्युनतम दर प्राप्त निविदाधारकाकडे (L1) किमान लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन वाहतूक करणारी पाच वाहने असावीत. सदर वाहनांचे पुरवठयाकरिता सक्षम असल्याबाबतचे परिवहन विभागाचे नोंदणीकृत प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. सदर वाहनाची लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन वाहून नेण्याची लोडींग क्षमता किमान १० टन असणे आवश्यक आहे. निविदाधारकाने वाहनाची पुढील कागदपत्रे सादर करावी-

अ) आर सी बुकची छायांकित प्रत व त्या सर्व वाहनाची छायाचित्रे.

ब) सर्वसमावेशक विमा प्रतीची साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती (Comprehensive Insurance)

क) त्याच वाहनांसाठी आर. टी. ओ. कडून योग्यता प्रमाणपत्र (Fitness Certificate )

ड) वाहनचालकाचे हेवी ट्रान्सपोर्ट लायसन्स असणे आवश्यक आहे.

20) जर निविदाधारक लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन टँक मधून सिलेंडर भरत असतील तर त्याचा लिक्वीड मेडिकल ऑक्सीजनच्या किमान एक उत्पादकांचे अधिकृत पत्र व डिलरशिप प्रमाणपत्र आवश्यक आहे. (As per Annexure)

21) निविदाधारकाकडे जी एम पी प्रमाणपत्र (Good manufacturing practice Certificate) No Conviction Certificate आणि (Performance Certificate) अन्न व औषध प्रशासनाचे असावे.

22) निविदाधारकाने किमान ५० लाखाचे सॉल्व्हेंसी प्रमाणपत्र सादर केले पाहिजे.

23) निविदाधारकास शासकीय रुग्णालयास पुरवठयाचा तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

24) उत्पादनासाठी महाराष्ट्रात किमान 1 ASU प्लांट असणे आवश्यक आहे ज्याची क्षमता 300 TPD पेक्षा जास्त आहे.

25) निविदाधारकाने त्याच्या संस्थेची नोंदणी अन्न व औषध प्रशासन (FDA) यांच्याकडे केलेली परवाना/प्रमाणपत्र, व लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन पुरवठयाबाबत परवाना प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

30) निविदाधारकाकडे स्वत:चे किमान 05 टँकर असणे आवश्यक आहे, ज्याने RTC पुस्तकासह 20KL लिक्विड मेडिकल ऑक्सिजन टँकर आणि टँकरच्या छायाचित्रासह घातक पदार्थ वाहून नेण्यासाठी परवाना आणि द्रव वैद्यकीय ऑक्सिजन वाहून नेण्यासाठी PESO प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

## ई-निविदेच्या लिफाफा क्रमांक १

मध्ये खालील स्वयंसाक्षांकित केलेल्या प्रमाणपत्रांच्या प्रती SCAN करुन PDF मध्ये UPLOAD कराव्यात

1) Shop Establishment Act 1940 Valid Registration Certificate / Udyog Adhar

2) GST Registration certificate

3) Pan Card

4) Bank Details for RTGS / NEFT ( सोबत नमुना दिलेला आहे)

5) Adhar Card

E) खरेदी प्राधिकाऱ्यासोबत हितसंबंधाबाबत संघर्ष नसल्याबाबतचे हमीपत्र (सोबत नमुना दिलेला आहे)

F) Proof of Past Experience, Performance For this purpose submit Order copies or Client Satisfactory Certificate

G) Tender Form Fee & EMD PAID Receipt नेटबँकिंगव्दारे भरणा करावी निविदा फी व बयाना (EMD) रक्कम भरल्याबाबतचे विहित नमुन्यातील पावती (As part of e-Tendering Document Process) विहित स्कॅन करुन निविदेसोबत अपलोड करणे आवश्यक राहील त्याशिवाय निविदा विचारात घेतली जाणार नाही.

H) FDA Licence (IP No) Certificate

## ई - निविदेचा लिफाफा क्रमांक - २

१. ( Excel Sheet - BOQ) सोबत उपरोक्त बाबीचे दर सर्व करासहीत (डोअर डिलीव्हरी) दिलेल्या यादी व विवरणानुसार नमुद करावे.

२. ई - निविदेबाबत कायदेशीर अडचण आल्यास किंवा काही तक्रार उदभवल्यास न्यायालय ठिकाण सोलापूर जिल्हास्तर (मुख्यालय) राहील.

३. तांत्रिक लिफाफ्यामधील (ई-निविदेच्या लिफाफा क्रमांक १) सर्व कागदपत्रे परिपूर्ण असल्याची खात्री झाल्यानंतरच व्यापारी लिफाफा (ई-निविदेच्या लिफाफा क्रमांक-२) उघडण्यात येईल. तांत्रिक लिफाफ्यात फक्त ऑनलाईन अपलोड केलेले कागदपत्रेच विचारात घेण्यात येतील. तसेच कागदपत्रांमध्ये काही शंका वाटल्यास सत्यप्रती मागण्यांत येतील.

४. पुरवठादाराने एकदा दर नमूद केल्यानंतर व या कार्यालयात ई-निविदा उघडल्यानंतर जर L-1 पुरवठादाराने नमूद केलेल्या दरात पुरवठा करण्यास नकार दिल्यास किंवा करारनामा लिहून न दिल्यास किंवा ई-निविदेच्या कोणत्याही स्तरावर माघार घेतल्यास संबंधित पुरवठादारांची बयाणा (EMD) रक्कम जप्त करण्यांत येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

५. न्युनतम प्रथम निविदाधारकास (L-1) पुरवठा आदेश प्राप्त होताच लिक्विड मेडिकल ऑक्सीजनचा पुरवठा तात्काळ करावा लागेल.

उपरोक्त नमूद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहेत. त्यानुसार मी लिक्विड ऑक्सीजनची ई-निविदा सादर करीत आहे.

दिनांक-

स्थळ-

निविदाकराची स्वाक्षरी व शिक्का

# Item rate BoQ

**Tender Inviting Authority: Dean, Shri Chhatrapati Shivaji Maharaj Sarvopchar Rugnalaya Solapur**

**Name of Work: Liquid Medical Oxygen**

**Contract No:** 0217-2749419

Bidder Name :

| Sr. No. | Item description | Item Code / Make | Units | Basic Rate | Total amount without taxes |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Liquid Medical Oxygen | item-1 | 01 | | |